# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** धरमपेठ झोन क्र. 02 अंतर्गत कमिश्नर बंगला सिव्हील
**{सा.बां.वि. झोन क्र. २}** लाईन्स मागिल नाला, नेताजी मार्केटच्या मागिल नाला, ज्योती इलेक्ट्रिक हॅम्पियार्ड रोड समोरील नाला, पत्रकार सहनिवासच्या मागिल नाला, वोकहार्ड हॉस्पिटल शंकर नगर मागिल नाला, आणि चमेडिया वस्ती नाला येथिल विविध ठिकाणी नाल्यांचा भिंतींचे बांधकाम करणे या कामाची मुळ प्राकलनीय रक्कम रू. 2,54,54,752/- एवढी आहे. सदर्हु कामास पद क्र. A43901370812 अंतर्गत आर्थिक वर्ष सन 2023-24 मध्ये रू. 2,54,54,752/- चे प्रावधान उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. करीता सदर्हु प्राकलनास प्रशासकिय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

**टिपः-**

1. सदर्हु कामाला मा. मुख्य अभियंता यांच्याव्दारे तांत्रिक मान्यता क्र. CE/PWD/T.S/ 104/2023-24 दि. 28/06/2023 नुसार तांत्रिक मान्यता प्राप्त आहे.
2. सदर्हु कामाचा खर्च पद क्र. A43901370812 अंतर्गत प्रस्तावित आहे.
3. या कामाकरीता रितसर ऑनलाईन ई-निवीदा मागविण्यात येईल.
4. सविस्तर टिप्पणी नस्तीत उपलब्ध आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 494/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 12/08/2023**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, धरमपेठ झोन क्र. ०२ यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार धरमपेठ झोन क्र. 02 अंतर्गत कमिश्नर बंगला सिव्हील लाईन्स मागिल नाला, नेताजी मार्केटच्या मागिल नाला, ज्योती इलेक्ट्रिक हॅम्पियार्ड रोड समोरील नाला, पत्रकार सहनिवासच्या मागिल नाला, वोकहार्ड हॉस्पिटल शंकर नगर मागिल नाला, आणि चमेडिया वस्ती नाला येथिल विविध ठिकाणी नाल्यांचा भिंतींचे बांधकाम करणे या कामाची मुळ प्राकलनीय रक्कम रू. 2,54,54,752/- एवढी आहे. सदर्हु कामास पद क्र. A43901370812 अंतर्गत आर्थिक वर्ष सन 2023-24 मध्ये रू. 2,54,54,752/- चे प्रावधान उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. करीता सदर्हु प्राकलनास प्रशासकिय मंजुरी देण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**डॉ. अभिजीत चौधरी (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**